# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक                    ता. ११ जानेवारी २०२०**

# चला, वीज बचत करू या...!

## पोर्णिमा दिवसानिमित्त माटे चौकात जनजागृती : मनपा-ग्रीन व्हिजीलचे आवाहन

**नागपूर, ता. ११ :** आपल्या घरातील, प्रतिष्ठानातील अनावश्यक वीज दिवे किमान एक तास बंद ठेवा, असे आवाहन करीत माटे चौकात शुक्रवारी (ता. १०) नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी वीज बचतीचा जागर केला.

निमित्त होते नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पोर्णिमा दिवस उपक्रमाचे. तत्कालिन महापौर आमदार प्रा. अनिल सोले यांच्या संकल्पनेतून काही वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या पोर्णिमा दिवसाने आता चळवळीचे स्वरूप घेतले आहे. प्रत्येक पोर्णिमेला शहरातील एका चौकात जागर करण्यात येतो. मनपातर्फेही एक तास अनावश्यक पथदिवे बंद करण्यात येतात. चौक परिसरातील व्यापाऱ्यांना आणि नागरिकांनाही अनावश्यक वीज दिवे बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात येते.

शुक्रवारी (ता. १०) स्वयंसेवकांतर्फे माटे चौकात जनजागृती करण्यात आली. महापौर संदीप जोशी आणि आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनात आणि विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता ए.एस. मानकर, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कौस्तभ चॅटर्जी यांच्या नेतृत्वात ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी अनावश्यक वीज दिवे किमान एक तास बंद करण्याचे आवाहन केले. व्यापाऱ्यांनी आवाहनाला

प्रतिसाद देत अनावश्यक वीज दिवे बंद करून उपक्रमात सहभाग नोंदविला. यापुढे पोर्णिमा दिवसालाच नव्हे तर अन्य दिवशीही अनावश्यक दिवे बंद ठेवण्याचा संकल्प केला. ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कौस्तभ चॅटर्जी, टीम लीडर सुरभी जैस्वाल, सदस्य मेहुल कोसुरकर, बिष्णूदेव यादव, शीतल चौधरी, नम्रता जव्हेरी, प्रिया यादव, अश्विनी दाबले, विनीत काळे, अविनाश लाहेवार, तुषार मिरासे यांनी वीज बचतीचे महत्त्व समजावून सांग़त अनावश्यक वीज दिवे बंद करण्याचे आवाहन केले. मनपाच्या वतीने लक्ष्मीनगर झोनच्या सहायक अभियंता कल्पना मेश्राम, उपअभियंता गजेंद्र तारापुरे, सुनील नवघरे, प्रदीप खोब्रागडे, विप्लव भगत उपस्थित होते.